Indian Academy of Pediatrics (IAP)

महाराष्ट्र राज्य बालरोग तज्ज्ञ संघटना (MAHAIAP)

## प्रकरण १७ :

# बाल अत्याचार : संशय आणि प्रतिबंध

जगभरात बाल अत्याचाराची समस्या आहेच. हे अत्याचार शारीरिक, भावनिक किंवा लैंगिक असू शकतात. याबाबत आपण पालकांनी सजग राहिले तरच योग्य वेळी पाउले उचलून याला आळा घालता येईल. आजच्या प्रश्नोत्तरात ह्या बाबत जाणून घेऊया


अध्यक्ष २०२२ : डॉ. हेमंत गंगोलिया

सचिव २०२२-२३ : डॉ. अमोल पवार

मार्गदर्शक : डॉ. जयंत उपाध्ये

समन्वयक : डॉ. नरेंद्र नानिवडेकर

अनुवाद : डॉ. उज्ज्वला गवळी

पुनरावलोकन : डॉ. चित्रा दाभोळकर, अविनाश शिरगावकर

*Convener:* **Kiran Aggarwal**

*Member:* **RS Sethi**




## 10 FAQs on WHEN AND HOW DO I SUSPECT AND PREVENT ABUSE IN MY CHILD?

१) 'बाल अत्याचार म्हणजे काय? याविषयी पालकांना काय माहीत असणे आवश्यक आहे? पालकांनी आपल्या मुलांवर अत्याचार होऊ नये म्हणून त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून काय काळजी घ्यावी?

२) मुलांवर कोण अत्याचार करतात? एखाद्या मुलावर कोणत्या प्रकारचे अत्याचार होऊ शकतात? रडणाऱ्या बाळाला शांत करण्यासाठी रागावणे म्हणजे अत्याचार आहे का? रडणाऱ्या बाळाला रागावल्याशिवाय कसे शांत करावे?

३) बाल अत्याचार झाल्याचा संशय आल्यावर मी काय करावे? बाल अत्याचाराबाबत भारतात काय कायदा आहे? मुलांना शिस्त लावण्यासाठी केलेल्या सर्व शारीरिक शिक्षा हानिकारक आहेत का?

४) मुलांवर अत्याचार होत आहे हे ओळखण्यासाठी काही लक्षणे माहीत असली तर आम्हाला निश्चित मदत होईल. पण जर अशीच लक्षणे अत्याचार न झालेल्या एखाद्या मुलात आढळली तर कसे ओळखायचे?

५) मुलांना गुप्तांगांची माहिती आणि त्यांची शास्त्रीय / जैविक नावे कोणत्या वयात सांगावी? एखाद्या मुलाला संमती देण्याबद्दल कधी शिकवावे?

६) काही विद्यार्थ्यांना लैंगिकतेबद्दल पूर्णपणे माहिती असते आणि ते इतर विद्यार्थ्यांना बिघडवण्याचा प्रयत्न करत असतात, अशावेळी पालक आणि शिक्षक या नात्याने हे टाळण्यासाठी काय केले पाहिजे?

७) जेव्हा लहान मूल इतर प्रौढांना आणि मुलांना अयोग्यरित्या स्पर्श करते तेव्हा काय करावे? मुलांनी त्यांच्या स्वत:च्या किंवा समवयस्क मित्र-मैत्रिणींच्या लैंगिक भागाला स्पर्श करणे / हाताळणे कितपत योग्य आहे?

८) माझी मुलगी ३० ते ४५ वर्षे वयोगटातील कोणत्याही पुरुष सहकाऱ्यांपासून दूर राहते. यात तिचे काका, गुरुजी किंवा माझे मित्र असतात. वारंवार भेट झाली तरी ती दूर-दूरच राहते. परंतु आजी-आजोबांच्या वयातील पुरुष किंवा ३० वर्षांपेक्षा कमी वयाच्या पुरुषांशी मिळून मिसळून राहते. यामुळे जिथे तिला पुरुष शिक्षक शिकवणार असतील त्या कोणत्याही खेळात ती सामील होत नाही. कोणतेही काका किंवा आमचे पुरुष नातेवाईक उपस्थित असतील अशा कोणत्याही व्हिडिओ चॅटमध्ये ती सामील होत नाही. याबाबत मी खरोखर गोंधळले आहे. कृपया मार्गदर्शन करावे.

९) एखादे मूल आघात विसरू शकत नसेल, तर ते हिंसक (शारीरिक /लैंगिक) होऊन (स्वतःला हानी न होऊ देता) इतरांना इजा करू शकते का? लैंगिक अत्याचाराच्या बाबतीत आणखीन एक वळण लागू शकते का .... म्हणजे एखाद्या मुलाला ते लैंगिक संबंध चालू ठेवावेसे वाटतात आणि ते मूल तसे संबंध ठेवण्याची शक्यता असते का?

१०) कृपया सांगा की मुले अशा अनुभवातून कशी सावरतील? आपल्या मुलांवर लैंगिक अत्याचार झाले हे कळल्यावर पालक ते कशाप्रकारे हाताळतात? मला भीती वाटते की मी कोलमडून जाईन.

**Under the Auspices of the IAP Action Plan 2021–2022**


**Piyush Gupta** IAP President 2021

**Remesh Kumar R** IAP President-Elect 2021

**Bakul Parekh** IAP President 2020

**GV Basavaraja** IAP HSG 2020–2021

**Deepak Ugra** National Co-ordinator

© Indian Academy of Pediatrics

## IAP Parent Guideline Committee

**Chairpersons:** Piyush Gupta, Bakul Parekh
**IAP Co-ordinators:** GV Basavaraja, Harish Kumar Pemde, Purna Kurkure

### Core Group

*National Co-ordinator:* ***Deepak Ugra***
*Member Secretaries:* ***Upendra Kinjawadekar, Samir Dalwai***
*Members:* ***Apurba Ghosh, CP Bansal, Santosh Soans, Somashekhar Nimbalkar, S Sitaraman***

# 17

# माझ्या मुलावर बाल–अत्याचार झाला आहे असा संशय मी कधी घ्यावा आणि त्याचा प्रतिबंध करण्यासाठी काय करावे?




*Source:* iSTOCK.




*Source:* Pixabay.

प्रश्न
(१)

## ’बाल अत्याचार म्हणजे काय? याविषयी पालकांना काय माहीत असणे आवश्यक आहे? पालकांनी आपल्या मुलांवर अत्याचार होऊ नये म्हणून त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून काय काळजी घ्यावी?

जेव्हा एखाद्या मुलाची काळजी घेणारी एखादी व्यक्ती मुलाच्या भावना दुखावते किंवा शारीरिक दुखापत करते तेव्हा त्याला बाल अत्याचार असे संबोधले जाते. सामान्यत: शारीरिक शोषण हे वारंवार आणि जाणूनबुजून केलेल्या कृत्यांचे उदाहरण आहे. काळजी घेणाऱ्यांना हे समजत नाही की ते जे करत आहेत ते एक अपमानास्पद कृत्य आहे आणि हा एक प्रकारचा अत्याचार आहे. ते मुलांना शिस्त लावण्याकरिता म्हणून हे करतात. उदाहरणार्थ पाच वर्षाखालील मुलाला जास्त रडल्यावर शिक्षा म्हणून डोके धरून जोरजोराने हलवल्याने मेंदूला इजा होऊ शकते. याला ‘अपमानास्पद डोक्याला आघात’ (abusive head trauma) असे म्हणतात. यामुळे कायमचे नुकसान होऊ शकते किंवा क्वचित प्रसंगी मृत्यू पण येऊ शकतो.



आकृती : नवरा आपल्या लहान मुलीसमोर पत्नीशी हुज्जत घालत आहे

मुलांना सन्मानाने जगण्याचा अधिकार असलेली व्यक्ती मानली जाणे आवश्यक आहे आणि मुले ही त्यांच्या पालकांची मालमत्ता नाही. कोणत्याही कुटुंबात मुले किंवा मुली दोघांवरही समान अत्याचार होऊ शकतात. त्यांची शारीरिक दुखापत बरी होऊ शकते परंतु दुखावलेल्या भावना किंवा भावनिक आघात त्यांच्यासोबत दीर्घकाळ किंवा आयुष्यभर राहू शकतो.



कुटुंबालाच एका सर्वंकष सुरक्षिततेची गरज आहे



Ch-017.indd 4 16-11-2021 09:49:01

## लक्षात काय ठेवाल ?

**पालकांना काय माहीत असणे आवश्यक आहे ?**

मुलांना अत्याचारापासून वाचवण्यासाठी

- पालकांना माहीत हवे की गैरवर्तन हानिकारक आहे. आपण कसे वागावे ? आपण सर्व मुलांना सुरक्षित ठेवू शकतो.
- कौटुंबिक हिंसाचारापासून मुलांचे रक्षण करा .
- मारहाणीमुळे डोक्याला होणारी दुखापत टाळता येते.. रागाने बाळाला कधीही हलवू नका .
- आपण तणावग्रस्त असताना राग कसा नियंत्रित करायचा हे पालकांनी स्वतः शिकले पाहिजे.
- मुलांमध्येही मुलींइतकेच लैंगिक अत्याचार होतात. त्यांना देखील संरक्षणात्मक कवच आवश्यक आहे.
- अपंग मुले अत्याचाराला अधिक बळी पडतात. त्यांना ज्यादा वेळ देण्याची आवश्यकता असते.
- तुरुंगात असलेल्या पालकांच्या मुलांवर अत्याचार होण्याची शक्यता असते. त्यांच्यावर राज्याने लक्ष ठेवले पाहिजे.
- बहुतेक मुलांना त्यांच्या घराच्या चार भिंतीत लैंगिक शोषणाचा सामना करावा लागतो. त्यांचें म्हणणे लक्षपूर्वक ऐका आणि विश्वास ठेवा.
- तुमच्या ओळखीचे मूल डोळ्यांचा संपर्क टाळत असल्यास मुलाकडे लक्ष द्या.
- बालशोषण व्यवस्थापनातील पहिली गोष्ट म्हणजे पुढील अत्याचार थांबविणे.
- मुलांच्या ऑनलाइन गैरवापरावर पालकांनी सतत लक्ष ठेवले पाहिजे.
- योग्य दिशेने वाढ आणि विकास होणाऱ्या मुलाचा विकास खुंटला आणि उलट दिशेने जाऊ लागला (regression) तर मुलावर अत्याचार होत असल्याची शक्यता असते.
- लिंग भेद टाळा. मुला–मुलींना समान वागणूक द्या.
- सकारात्मक पालकत्वाबद्दल जाणून घ्या.
  मुलांना स्वतंत्र व्यक्ती म्हणून वागवले जावे. तो त्यांचा अधिकार आहे.
  मुलांच्या वाढीच्या टप्प्यातील बदलांना न घाबरता आत्मविश्वासाने सामोरे जा.
- त्यांना चांगले स्पर्श आणि वाईट स्पर्श याची वयानुसार माहिती द्या.
- मुलांना त्यांच्या शरिराबद्दल योग्य शब्द वापरून आत्मविश्वासाने बोलण्यास/ जाणून घेण्यास मदत करा .
- मुलांसाठी मोठे होण्याची प्रक्रिया ही मजेचा अनुभव असावी, आपल्या विकासात त्यांनी आत्मविश्वासाने सहभागी झाले पाहिजे.
- वयोमानानुसार लैंगिक शिक्षणाबरोबरच जीवन कौशल्य शिक्षण देणे ही काळाची गरज आहे. मुलांना काय करावे आणि काय करू नये हे त्यांना माहीत असणे आवश्यक आहे
- एकल पालकांच्या मुलाला अत्याचाराचा अधिक धोका असतो.
- बालविवाहाला प्रतिबंध करा. तसेच असा विवाह होत असल्यास पोलिसांना कळवा.




*Source:* iSTOCK.

प्रश्न
(२)

## कोण अत्याचार करतो? एखाद्या मुलावर कोणत्या प्रकारचे अत्याचार होऊ शकतात? रडणाऱ्या बाळाला शांत करण्यासाठी रागावणे म्हणजे अत्याचार आहे का? रडणाऱ्या बाळाला न चिडता कसे शांत करावे?

- **अत्याचार करणारा :** यावरील अभ्यास असे दर्शवतो की जे लोक मुलांवर अत्याचार करतात, त्यांच्या स्वतःच्या बालपणात त्यांच्यावर अत्याचार झाला असतो. कित्येकदा हे लोक अमली पदार्थांचे सेवन करत असतात असे आढळले आहे. दारू, मादक पदार्थ किंवा तत्सम पदार्थांचे व्यसन असलेली माणसे सामान्यत: हिंसक वर्तन करतात आणि इतरांना इजा करतात. गरीब किंवा कर्जबाजारी पालक मुलांना त्यांच्या अडचणींचे प्रमुख कारण मानू शकतात. मुलांना शिस्तबद्ध बनवण्यासाठी शारीरिक शिक्षा देणे योग्य समजतात आणि त्याकरिता अनुमती देतात. अशा प्रकारे मुलांवर त्यांच्या शिक्षकांकडून, काळजी घेणाऱ्या व्यक्तीकडून किंवा घरी पालकांकडून अत्याचार केले जातात. पालकांचे मूल्यविषयक निकष योग्य नसणे, पालकांची मुलाच्या स्वभावाशी जुळवून घेण्याची असमर्थता आणि त्यांच्यावरील जबाबदाऱ्यांचे ओझे यामुळे मुलांवर अत्याचार करण्याची प्रवृत्ती निर्माण होते.



मद्यपी वडील आपल्या मुलाबरोबर


### जे पालक आपल्या मुलांवर अत्याचार करतात

- ते त्यांच्या मुलांबद्दल नकारात्मक बोलतात किंवा आपल्या मुलाचे वागणे 'चांगले नाही' म्हणू शकतात
- मुलांनी इतरांना भेटू नये असा प्रयत्न करतात
- मुलांच्या जखमांबद्दल योग्य माहिती देत नाहीत आणि विचित्र पद्धतीने वागतात.
- मुलांबद्दल आस्था दर्शवू शकत नाही.

### अत्याचाराचे प्रकार

#### शारीरिक शोषण

जेव्हा मुलाला शारीरिक दुखापत होते, हाताने किंवा कोणत्याही वस्तूने जोराने मारणे उदाहरणार्थ कमरेचा पट्टा किंवा काठी ज्यामुळे मुलाला जखम किंवा वेदना होतात, बुक्का मारणे, ढकलणे आणि वेदनादायकरित्या पकडणे, ओढणे किंवा लाथ मारणे हे सर्व शारीरिक अत्याचार आहेत. रडणे थांबवण्यासाठी पाच वर्षाखालील मुलाला जोरजोरात हलवल्याने डोक्याला आघात होऊ शकतो. त्यामुळे बहिरेपणा किंवा अंधत्व येवू शकते, मज्जासंस्थेला इजा पोहोचू शकते आणि मृत्यू देखील येऊ शकतो. ज्या माणसाला लगेच राग येतो आणि तो ताब्यात ठेवता येत नाही,ज्या व्यक्तीची प्रवृत्ती हिंसक आहे अशा व्यक्तीसोबत तुमच्या बाळाला कधीही एकटे सोडू नका, एखाद्याला मदतीसाठी विचारणे ठीक आहे. लहान मुलांमध्ये रडणे नॉर्मल आहे, तो सामान्य (normal) विकासाचा एक भाग आहे.



*Source:* Social Axiom Foundation (Project CACA)

- How to calm the baby?: *https://youtu.be/j2C8MkY7Co8k.*
- *https://raisingchildren.net.au/newborns/videos/settle-a-crying-baby?*
- The Australian parenting website: *raisingchildren.net.au.*

**लैंगिक अत्याचार :**

जेंव्हा कोणतीही प्रौढव्यक्ती लैंगिक कारणांसाठी मुलाचा वापर करते किंवा मुलाला लैंगिक कृतीमध्ये सामील करते तेव्हा त्याला लैंगिक अत्याचार म्हणतात. एखादे मोठे किंवा शक्तिवान मूल लैंगिक उत्तेजनासाठी किंवा समाधानासाठी लहान किंवा कमकुवत मुलाचा वापर करते त्यालाही लैंगिक अत्याचार म्हणतात.



*Source:* iSTOCK.

लैंगिक शोषण म्हणजे 'संपर्क नसलेला अत्याचार' (noncontact abuse) असू शकतो. यामध्ये लहान मुलाला लैंगिक कृत्य दाखवणे किंवा लैंगिक अवयव दाखवणे, लहान मुलाचे शरीर हाताळणे, मुख–समागम करणे, बाल वेश्याव्यवसाय, अश्लील वाङ्मय आणि ऑनलाईन लैंगिक शोषण यांचा समावेश होतो



Ch-017.indd 7 16-11-2021 09:49:02

**भावनिक अत्याचार :**

जेव्हा एखाद्या मुलाची काळजी घेणारा एखादी प्रौढ व्यक्ती मुलाचा सतत अपमान करते, धमकी देते, त्याच्या वागणुकीबद्दल सतत पूर्वग्रहदूषित मते बनवते, अपमान करते किंवा झिडकारते, आणि त्या व्यक्तीकडून मुलाला प्रेम मिळत नाही तेव्हा मुलाला स्वत:विषयी नकारात्मक भावना निर्माण होतात. या भावनिक अत्याचाराचे परिणामही दीर्घकाळपर्यंत शारीरिक अत्याचाराएवढेच गंभीर असू शकतात.




मुलांवरील भावनिक अत्याचार

**वैद्यकीय बालशोषण :**

मोठ्या माणसांकडून अतिकाळजीपोटी गरज नसताना सतत वैद्यकीय तपासण्या, विविध रक्ततपासण्या, सतत वेगवेगळी औषधे, शस्त्रक्रिया इ.साठी मुलावर जो अत्याचार होतो, त्याला वैद्यकीय बालअत्याचार म्हटले जाते.

**गैरवर्तनाची प्रारंभिक लक्षणे किंवा धोक्याच्या सूचना**

- पोटदुखी, डोकेदुखी यासारखी कारण न समजू शकणारी लक्षणे.
- भयानक स्वप्ने किंवा झोपेच्या समस्या.
- अचानक कुठल्याही वेळी विचलित झाल्यासारखे वाटणे.
- खाण्याच्या सवयींमध्ये अचानक बदल, खाण्यास नकार देणे, भूक कमी होणे, गिळताना त्रास होणे
- अचानक मूड बदलणे उदा. भीती, चिंता, राग .
- आंघोळीपूर्वी, शौचाला जाताना आणि डायपर बदलताना म्हणजे जेव्हा कपडे काढणे योग्य असते तेव्हा सुद्धा कपडे काढण्यापासून प्रतिकार करणे.
- लिखाणात, चित्र रेखाटताना, खेळताना, स्वप्न बघताना लैंगिक किंवा भीतीदायक प्रतिमा आढळून येणे
- विशिष्ट लोकांबद्दल किंवा एखाद्या ठिकाणाबद्दल विचित्र आणि नव्याने भीती वाटणे.
- कुठल्याही नव्या मोठ्या मित्राबद्दल बोलू लागणे.
- अचानक त्याच्याजवळ पैसे, खेळणे किंवा इतर भेटवस्तू दिसायला लागणे
- स्वतःला अथवा आपल्या शरीराला गलिच्छ समजू लागणे
- अचानक प्रौढांसारखी वागणूक किंवा भाषा बोलू लागणे .
- विशिष्ट लोकांसोबत एकटे राहण्यास तयार नसणे
- स्वतःच्या गुप्तांगांशी जास्त खेळणे
- इतरांच्या खाजगी भागांना अयोग्य रित्या स्पर्श करणे.
- वारंवार मुत्रमार्गाचे संक्रमण, लैंगिक संबंधातून पसरणारे रोग आढळून आले

लैंगिक शोषणाच्या बहुतेक प्रकरणांमध्ये, जवळच्या विश्वासू प्रौढ किंवा कुटुंबातील सदस्यांचा समावेश असू शकतो. ही माणसे मुलाच्या विश्वासाचा गैरवापर करतात.

**उपेक्षा**

जेव्हा मुलांची काळजी घेणाऱ्या व्यक्तीकडून पुरेसे अन्न ,कपडे, निवास, वैद्यकीय सेवा, शालेय शिक्षण, मुलांची काळजी घेण्यासाठी आवश्यक आहे त्या मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष केले जाते त्याला उपेक्षा म्हणतात.



*Source:* iSTOCK.

**प्रश्न (३)**

**बाल अत्याचार झाल्याचा संशय आल्यावर मी काय करावे? बाल अत्याचारा बाबत भारतात काय कायदा आहे? मुलांना शिस्त लावण्यासाठी केलेल्या सर्व शारीरिक शिक्षा हानिकारक आहेत का?**




*Source:* iSTOCK.

जर तुम्हाला एखाद्या मुलावर अत्याचार झाल्याचा संशय येत असेल किंवा मूल तुम्हाला एखाद्याच्या गैरवर्तनाबद्दल सांगत असेल तर मग आपण खाली निर्देश केलेल्या ठिकाणी संपर्क करू शकता .

- बाल कल्याण समिती
- पोलीस
- हॉस्पिटल/ वन स्टॉप सेंटर
- बीबीए (एनजीओ) हेल्पलाइन १८००-१०२-७२२२ वर तक्रार करून बालविवाह थांबवू शकतो.
- The Protection of Children from Sexual Offenses (POCSO) ई बॉक्स ncpr.gov.in येथे बालहक्क संरक्षणासाठी राष्ट्रीय आयोगाला ऑनलाइन अहवाल देता येतो.
- चाइल्ड हेल्पलाईन १०९८.

बाल अत्याचाराबाबत कायदा कधीही आपल्या हातात घेऊ नका किंवा एखाद्या व्यक्तीला धमकावू नका. कायदेशीर यंत्रणा आपली काम करतच असते .

कोमल – हा चाईल्ड लाईन १०९८ द्वारे बाल लैंगिक अत्याचारावरील चित्रपट आहे.

www.youtube.com
https// www.YouTube.com/results?search_query=komal

**जरी तुम्हाला गैरवर्तनाबद्दल खात्री नसेल, परंतु काळजी वाटत असेल तरी तक्रार नोंदवू शकता. काही अयोग्य घडले आहे की नाही हे शोधण्यासाठी संबंधित अधिकारी लक्ष घालतील. तक्रार करणे चांगले आहे कारण पहिली गोष्ट म्हणजे पुढील गैरवर्तन थांबवता येते .**

- Juvenile (teenager) Justice ct २०१५, किशोरवयीन मुलांना न्याय देणारा कायदा २०१५ यानुसार कोणीही लक्ष न दिलेली मुले आढळल्यास तक्रार करणे अनिवार्य आहे.
- आमच्याकडे एनसीपीसीआर (नॅशनल कमिशन फॉर प्रोटेक्शन ऑफ चाईल्ड राइट्स)द्वारे २०११ मध्ये आणलेल्या शारीरिक शिक्षांसंबंधी मार्गदर्शक तत्त्वे आहेत.

**आम्ही पालकांना सुचवू इच्छितो की मुलाला शिस्तीत वाढवण्यासाठी कठोर शारीरिक शिक्षा करण्याऐवजी पर्याय म्हणून मवाळ आणि नावीन्यपूर्ण पद्धतीचा अवलंब करावा. अशी पद्धत अखेर उपयुक्त ठरते.**



*Source:* iSTOCK.

- लैंगिक अत्याचाराच्या बाबतीत आमच्याकडे सक्तीची तक्रार करण्याची तरतूद आहे. परंतु इतर सर्व प्रकारच्या अत्याचारासाठी ज्या मुलांवर अत्याचार झाले आहेत त्याबद्दल तक्रार करणे ही आपली नैतिक जबाबदारी असते. अशा मुलांना किंवा त्यांच्याशी संबंधित समस्या हाताळताना नेहमीच त्यांच्या हिताचे वागले पाहिजे .
- POCSO (Protection of Children against Sexual Offences) याला लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण कायदा असे म्हणतात. १४ नोव्हेंबर २०१२ पासून हा नवीन कायदा अमलात अंमलात आल्यावर मुलाच्या हिताचे रक्षण अधिक चांगल्या पद्धतीने करण्याच्या दृष्टीकोनातून बाललैंगिक शोषणाची संकल्पना आणि व्यवस्थापन प्रत्येक टप्प्यावर बरेच बदललेले आहे.
  - पुनर्वसन
  - नुकसान भरपाई
  - सर्व कायदेशीर प्रक्रिया मुलांच्या दृष्टीने सुलभ (child friendly) करणे.

## POCSO (सुधारणा) कायदा २०१२

- १८ वर्षाखालील सर्व व्यक्तींना लागू.
- लिंग तटस्थ (पुरुष, महिला किंवा तृतीयपंथी म्हणजेच कुठल्याही लिंगाची माणसे पीडित किंवा आरोपी असू शकतात)
- मुलाच्या दृष्टीने सुलभ (child friendly) मुलाच्या हितासाठी कार्य करण्याच्या दृष्टीकोनातून सर्व संबंधित लोकांसाठी मार्गदर्शक तत्वे आहेत.
- संमती देण्याचे वय १८ वर्षे आहे. १८ वर्षाखाली संमतीनेदेखील संभोग करणे हा गुन्हा आहे.
- लहान मुलांमध्ये काम करणाऱ्या सर्व लोकांनी बाललैंगिकशोषण होत आहे हे लक्षात आल्यास त्याचा ताबडतोब अहवाल देणे अनिवार्य आहे. अशा केसचा अहवाल न देणे हा दखलपात्र दंडनीय गुन्हा आहे.
- पोलिस उपनिरीक्षक (गणवेशात नसलेल्या) पदापेक्षा कमी नसलेल्या महिला पोलिस अधिकाऱ्याने मुलाचे स्टेटमेंट पोलीस ठाण्यात न जाता मुलांच्या पसंतीच्या ठिकाणी नोंदवावे.
- पुराव्याचा भार आरोपींवर असतो (आरोपींना आपण स्वतः दोषी नाही हे सिद्ध केले पाहिजे )
- न्यायालयात खटला दाखल केल्यावर खाजगीरीत्या साक्ष नोंदवली जाते. विशेष न्यायालयात सत्रन्यायाधीशासमोर केस लढवली जाते आणि शोषित मुलास वारंवार विराम दिला जातो.
- बचाव पक्षाचे वकील फक्त न्यायाधीशांच्या मार्फतच प्रश्न मांडू शकतात, थेट मुलाला प्रश्न विचारू शकत नाहीत.
- १२ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांवर लैंगिक अत्याचार करणाऱ्यांना फाशीच्या शिक्षेची तरतूद आहे.
- शिक्षा श्रेणीबद्ध तीव्रतेनुसार आहे.
- मुलाला प्रत्येक टप्प्यावर मदत करणारी व्यक्ती असणे आवश्यक आहे आणि आवश्यक असल्यास दुभाषी, विशेष शिक्षक असावा.

प्रश्न
(४)

## मुलांवर अत्याचार होत आहे हे ओळखण्यासाठी काही लक्षणे माहित असली तर आम्हाला निश्चित मदत होईल. पण जर अशीच लक्षणे अत्याचार न झालेल्या एखाद्या मुलात आढळली तर कसे ओळखायचे?

- बालशोषणाकडे प्रसारमाध्यमांद्वारे खूप लक्ष दिले जात असल्याने, पालकांना लैंगिक वर्तनाबद्दल चिंता वाटणे सहाजिक आहे. आपल्या मुलांचे लैंगिक शोषण तर होत नाही आहे ना याची काळजी वाटते. सामान्यपणे मुलांमध्ये लैंगिक वर्तन १३ वर्षापासून सुरु होते.
- लैंगिकतेबद्दल पालकांचा दृष्टिकोन, कुटुंबावर परिणाम करणारे घटक, कुटुंबाची संस्कृती आणि चालीरीती, पाळणाघराची व्यवस्था इत्यादी विविध घटक लक्षात घेऊन लैंगिक वर्तन समजून घेतले पाहिजे.
- लैंगिक वर्तनसमस्या असलेल्या मुलांसाठी सुरक्षा–योजनेचे व्यवस्थापन करताना कुटुंबातील ताण, लैंगिक सामग्री किंवा कृत्ये यामध्ये मुलाला मिळणारी संधी, घरगुती हिंसाचार आणि लैंगिक गैरवर्तनाच्या दृष्टीने असणारे धोक्याचे घटक यासंबंधी सखोल माहिती असणे गरजेचे आहे.
- एखाद्या मुलाच्या बाबतीत दिसून आलेले लैंगिक वर्तन त्याच्या वयानुसार नॉर्मल आहे की वयानुरूप नाही हे समजण्यास बालरोगतज्ञ सक्षम हवा.

**जे पालक सर्व लैंगिक वर्तनाना चुकीचे आणि अस्वीकारहार्य मानतात, ते मुलांचे लैंगिक वर्तन वयानुसार बरोबर असताना देखील अयोग्य ठरवतात. सामान्य (normal) लैंगिक वर्तनाबद्दल पालकांच्या तीव्र प्रक्रियेमुळे अशा वर्तनामध्ये वाढ होऊ शकते.**


### मुलांमधील लैंगिक वर्तणूकीबद्दल 'काळजी घेणाऱ्या व्यक्ती'साठी प्रश्न

- प्रथमच वागणूक कधी लक्षात आली?
- कुटुंबात अलीकडेच तणाव निर्माण झाला आहे का?
- पालकांचे वेगळे होणे किंवा नवीन भावंडाचे आगमन अशाप्रकारच्या मुलाच्या बाबतीत घडलेल्या अलीकडील बदलांशी संबंधित त्याचे लैंगिकवर्तन असू शकते.
- लैंगिक वर्तनात इतर लोकांचा समावेश आहे का? बहुतेक लैंगिक वर्तनसमस्येमध्ये इतर लोकांचा समावेश असतो.
- असे वर्तन तुम्हाला किती वेळा लक्षात आले आहे? वर्तनाचे स्वरूप किंवा सातत्य बदलते आहे का? सातत्यामध्ये चिंता किंवा ताण दिसतो का? अशा वागण्यापासून मुलाला सहज दूर करता येईल का?
- अशा वर्तनावर तुमची प्रतिक्रिया कशी आहे? काळजी घेणाऱ्या व्यक्तीच्या त्रासदायक वर्तनामुळे मुलाची वर्तणूक बिघडू शकते.
- हे वर्तन घरी / पाळणाघरात /शाळेत किंवा सर्व ठिकाणी घडते का? जर ते फक्त घरीच घडत असेल  तर ते कुटुंबातील ताण किंवा कुटुंबातील इतर बदलांमुळे असू शकते.

- जर वर्तनात इतर व्यक्तींचा समावेश असेल तर त्या व्यक्तीचे वय किती आहे? जर वर्तनात सहभागी व्यक्तीचे वय मुलापेक्षा ४ किंवा ४ वर्षांपेक्षा जास्त असेल ते वयानुसार अयोग्य आहे.
- जर कृती जबरदस्त किंवा धोकादायक असेल तर ती विकृती आहे.
- मुलाला सतत भीती किंवा चिंता वाटत राहते का? किंवा मुलाला भावनिक किंवा वर्तणूक समस्या आहेत का?
- त्यांच्या घरात राहणाऱ्या लोकांसोबत काही हिंसाचार आहे का?
- मुलाला कोणत्याही लैंगिक क्रियाकलापात सामील करून घेतले जाते का? अश्लील चित्रपट, नग्नता, इंटरनेट किंवा लैंगिक भाषा वापरलेल्या लिखाणाशी त्याचा संपर्क येतो का ?
- मुले जे पाहतात किंवा ऐकतात ते करू शकतात. लैंगिक अत्याचाराबद्दल कोणी मुलाशी कधी बोलले आहे का? (लैंगिक वर्तन हे लैंगिक शोषण, शारीरिक अत्याचार आणि अज्ञान यांच्याशी जोडले आहे)

प्रश्न (५)

## मुलांना गुप्तान्गाची माहिती आणि त्यांची शास्त्रीय/जैविक नावे कोणत्या वयात सांगावी? एखाद्या मुलाला संमती देण्याबद्दल कधी शिकवावे?



आंघोळीची वेळ ही भावनिक बंध दृढ करण्याची वेळ असू शकते

सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून तुमच्या मुलाचे वय १ ते ३ वर्ष असताना त्याच्या शरीराच्या विविध भागांविषयी-तोंड, स्तन, जननेंद्रिय, नितंब इत्यादी बद्दल अगदी सुरुवातीपासूनच शिकवा. पूर्वपरवानगीशिवाय कोणालाही ते पाहण्याची किंवा स्पर्श करण्याची परवानगी देऊ नका. कृपया पालकांना किंवा काळजी घेणाऱ्या व्यक्तीला त्यांच्या मुलांना आंघोळ करताना मदत करण्यास सांगा .दंतचिकित्सकाला त्यांच्या तोंडात पाहावे लागतांना पालकांपैकी एक हजर असावेत किंवा पालकांपैकी एकाच्या उपस्थितीत डॉक्टर किंवा परिचारिका त्यांचे खाजगी अवयव पाहू शकतात.

३ वर्षाच्या आसपास मुले त्यांच्या शरीराच्या अवयवांबद्दल प्रश्न विचारतात म्हणून तुम्ही ही वेळ त्यांना त्यांच्या शरीराच्या अवयवांची योग्य नावे सांगण्यासाठी वापरली पाहिजे. आंघोळीची वेळ हे शिकवायला सर्वोत्तम पद्धतीने वापरली जाऊ शकते.

- मुलांच्या निरोगी लैंगिक विकासाची पहिली पायरी म्हणजे कोणतीही लाज किंवा संकोच न बाळगता त्यांना जननेंद्रियाविषयी शिकवणे आणि त्याबद्दल उघडपणे बोलणे.
- अलीकडील संशोधनात असे दिसून आले आहे की योग्य नावे जाणून घेतल्याने शरीराची सहज ओळख होण्यास किंवा त्याची कल्पना करण्यास मदत होते. लैंगिक शोषण टाळण्यास किंवा तसे झाल्यास त्याबद्दल बोलण्यास मदत होते. जेव्हा एखाद्या लहान मुलाशी गैरवर्तन केले जाते किंवा शरीराशी चाळे केले जातात (manhandled), तेव्हा योग्य भाषा जाणून घेतल्यामुळे मुलांना आणि प्रौढ दोघांनाही त्याचा सामना करण्यास मदत होईल.
- तुमच्या मुलांना मोकळेपणाने पुढील संभाषण करण्यास प्रोत्साहित करा.
- तुमच्या मुलांशी आयुष्यातील कठीण गोष्टींबद्दल बोला ते त्यांच्या शंका आणि कुतूहल याबद्दल कोणताही संकोच न करता बोलू शकतील.

प्रश्न (६)

## काही विद्यार्थ्यांना लैंगिकतेबद्दल पूर्णपणे माहिती असते आणि ते इतर विद्यार्थ्यांना बिघडवण्याचा प्रयत्न करत असतात, अशावेळी पालक आणि शिक्षक या नात्याने हे टाळण्यासाठी काय केले पाहिजे?

- लैंगिक वर्तणुकीच्या समस्यांची काळजी घेणे ही मुलांना सामान्यपणे विकसित होण्यास मदत करण्यासाठी एक महत्त्वाची बाब आहे.
- त्यांना लैंगिक विकास आणि पुनरुत्पादन याबद्दल योग्य शास्त्रीय माहिती दिली पाहिजे
- जेव्हा लैंगिक संबंध ठेवण्याचे योग्य वय वाटते तेव्हा त्याबद्दल कुटुंबात बोलणे महत्त्वाचे आहे .
- पालकांना वेगवेगळ्या वयोगटातील सामान्य लैंगिक वर्तन जाणून घेणे महत्वाचे आहे .
  - बालवाडी वयोगटातील – मुले त्यांच्या शरीराबद्दल उत्सुक असतात आणि ते आपले विविध अवयव हाताळत असतात
  - प्राथमिक वयोगट – त्यांनी त्यांच्या शरीरात स्वारस्य असते परंतु लैंगिक संभाषण आणि वर्तन या संदर्भातील  सामाजिक नियमांबद्दल ते अधिक जागरूक असतात.
  - माध्यमिक शाळा – या गटातील मुलांना लैंगिक भावनांची जाणीव होते, या वयात ते पौगंडावस्थेत प्रवेश करतात.
- लैंगिक वर्तन समस्या असलेल्या अनेक मुलांना मध्ये लैंगिक शोषणाचा इतिहास आहे परंतु, दुसरीकडे लैंगिक शोषण झालेल्या बहुतेक मुलांमध्ये लैंगिक वर्तन समस्या विकसित होत नाहीत असे आढळते.
- ज्या मुलांचे लहान वयात लैंगिक शोषण झाले आहे, ज्यांचे कुटुंबातील सदस्यांनी लैंगिक शोषण केले आहे किंवा ज्यांचा गैरवापर संभोगासाठी केला आहे त्यांना लैंगिक वर्तन समस्या विकसित होण्याचा धोका जास्त आहे .

**पालकांना हे माहीत असले पाहिजे :**

१) कोणते लैंगिक वर्तन स्वाभाविक आहे आणि कोणते अस्वाभाविक आहे ?

२) लैंगिक वर्तन सुधारण्याचा प्रभावी मार्ग जाणून घ्या.




*Source:* Social Axiom Foundation (Project CACA).



Ch-017.indd 15 16-11-2021 09:49:04

## प्रश्न (७)

### जेव्हा लहान मूल इतर प्रौढांना आणि मुलांना अयोग्यरित्या स्पर्श करते तेव्हा काय करावे? मुलांनी त्यांच्या स्वत:च्या किंवा समवयस्क मित्र-मैत्रिणींच्या लैंगिक भागाला स्पर्श करणे/हाताळणे कितपत योग्य आहे ?

- लहान मुलांमध्ये सामान्यत: असे दिसून येते की ते इतर लोकांच्या खाजगी भागांना स्पर्श करण्याचा आणि पाहण्याचा प्रयत्न करतात किंवा त्यांच्या अगदी जवळ उभे राहतात किंवा स्वतःच्या गुप्तांगांना स्पर्श करतात. ५ वर्षे वयानंतर अशी वागणूक कमी होते .
- एखाद्या लैंगिक वर्तणूकीची सवय झाली तर ती एक समस्या बनू शकते. उदाहरणार्थ ३ वर्षाचा मुलगा जर दिवसभरात अनेक वेळा आपल्या गुप्तांगांना स्पर्श करत असेल तर तो इतर दैनंदिन गोष्टी करण्याकडे लक्ष केंद्रित करू शकत नाही. तसे पाहता त्याचे वर्तन हे स्वाभाविक लैंगिक वर्तन आहे परंतु तो सतत करत असल्यास ते योग्य नाही.
- सामान्य लैंगिक वर्तनाच्या सूचीमध्ये दुर्मिळ असलेली (क्वचित आढळणारी) क्रिया जर एखाद्या मुलामध्ये दिसून आली तर ती लैंगिक समस्या आहे का नाही हे ठरवण्यासाठी अधिक लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

मुलांमधील लैंगिक विकास आणि वर्तन : https://www.ncts.org/sites/default/files/resources/sexual_development_and_behavior_in_children.pdf

## प्रश्न (८)

### माझी मुलगी ३० ते ४५ वर्षे वयोगटातील कोणत्याही पुरुष सहकाऱ्यांपासून दूर राहते. यात तिचे काका, गुरुजी किंवा माझे मित्र असतात. वारंवार भेट झाली तरी ती दूर-दूरच राहते. परंतु आजी-आजोबांच्या वयातील पुरुष किंवा ३० वर्षांपेक्षा कमी वयाच्या पुरुषांशी मिळून मिसळून राहते. यामुळे जिथे तिला पुरुष शिक्षक शिकवणार असतील त्या कोणत्याही खेळात ती सामील होत नाही. कोणतेही काका किंवा आमचे पुरुष नातेवाईक उपस्थित असतील अशा कोणत्याही व्हिडिओ चॅटमध्ये ती सामील होत नाही. याबाबत मी खरोखर गोंधळले आहे. कृपया मार्गदर्शन करावं

जेव्हा एखाद्या मुलीच्या बाबतीत लैंगिक गैरवर्तनाचा संशय येतो, तेव्हा पालकांनी योग्यप्रकारे लक्ष दिले पाहिजे. सामाजिक कार्यक्रमांमध्ये अशा वर्तणुकीपासून दूर जाणे, असे का घडते आहे ह्याचा सखोल तपास करणे, वर्तन चालू राहिल्यास समुपदेशकाची मदत घेणे किंवा संरक्षकसंस्थेकडे प्रकरणाची तक्रार करणे (कायद्यानुसार) इ. कार्यवाही करणे आवश्यक असते.


जेव्हा गैरवर्तनाचा संशय येत नाही परंतु लैंगिक वर्तनाचे मूल्यांकन आवश्यक असते, तेव्हा मुलीला मानसिक आरोग्य व्यावसायिकाकडे (mental health professional) पाठवले जाणे आवश्यक आहे. तिथे व्यावसायिक तुमच्याकडून सुद्धा संपूर्ण तपशीलवार माहिती घेईल.



Ch-017.indd 16 16-11-2021 09:49:04

**प्रश्न (९)**

**एखादे मूल आघात विसरू शकत नसेल, तर ते हिंसक (शारीरिक/लैंगिक) होऊन (स्वतःला हानी न होऊ देता) इतरांना इजा करू शकते का? लैंगिक अत्याचाराच्या बाबतीत आणखी एक वळण लागू शकते का .... म्हणजे एखाद्या मुलाला ते लैंगिक संबंध चालू ठेवावेसे वाटतात आणि ते मूल तसे संबंध ठेवण्याची शक्यता असते का?**




*Source:* Pixabay.

अभ्यासातून असे दिसून आले आहे की लहानपणी मुलाचे अज्ञान आणि अत्याचार यामुळे मोठेपणी त्याचे वर्तन गुन्हेगारी होऊ शकते. बालशोषणामुळे मुलामध्ये इतर आरोग्य समस्या देखील येऊ शकतात. बाल लैंगिक शोषणामुळे जीवनातील वेदनादायक अनुभव येतो परंतु लैंगिक शोषणाच्या सर्व पीडितांमध्ये एखादे चिन्ह किंवा लक्षण दिसत नाही.

लैंगिक शोषण झालेल्या मुलांना त्यांच्या लैंगिक वर्तनाबद्दल विशेष लक्ष देऊन प्रेमाने वागवले जाते. बाल लैंगिक शोषण झालेल्या मुलांमध्ये प्रगत लैंगिक वर्तणूक येऊ शकते. हे वर्तन मोठेपणीही चालू राहू शकते. उदाहरणार्थ प्रौढ पीडितांना असे वाटू शकते की इतरांशी लैंगिक संबंध ठेवल्याने त्यांना प्रेम आणि आपुलकी देता येईल .

अनेक अभ्यासातून असे दिसून आले आहे की, बाल लैंगिक शोषणामुळे स्त्रियांमध्ये लैंगिकदृष्ट्या धोकादायक वर्तन होते.



Ch-017.indd 17 16-11-2021 09:49:04

प्रश्न (१०)

**कृपया सांगा की मुले अशा अनुभवातून कशी सावरतील? आपल्या मुलांवर लैंगिक अत्याचार झाले हे कळल्यावर पालक कशाप्रकारे हाताळतात? मला भीती वाटते की मी कोलमडून जाईन.**




*Source*: iSTOCK.

**लैंगिक शोषणाचा परिणाम समजून घेणे**

जर एखाद्या वैद्यकीय व्यावसायिकाने तुम्हाला सांगितले किंवा तुमच्या मुलांचे लैंगिक शोषण झाले आहे असे तुम्हाला वाटत असेल, तर अशा प्रकारच्या लैंगिक अत्याचारामुळे होणारे परिणाम समजून घेतल्यामुळे तुमच्या मुलाच्या वर्तनावर लैंगिक शोषणाचा कसा परिणाम झाला आहे हे समजून घेण्यास मदत होऊ शकते.

**लहान मुले आणि पौगंडावस्थेतील मुले यांच्यावर लैंगिक शोषणाचा परिणाम**

- लैंगिक शोषणामुळे शारीरिक आणि भावनिक मर्यादांचे उल्लंघन होते. त्यामुळे अशा मुलांना हे जग असुरक्षित वाटू शकते. असे वाटू शकते की मोठी माणसे विश्वासार्ह नाहीत. त्यांना असुरक्षित परिस्थितीची जाणीवही नसते. त्यांच्यावर झालेल्या अत्याचाराबद्दल मुलांना कसे वाटते, अत्याचाराचा त्यांच्यावर काय परिणाम होतो आणि त्या परिणामांना कसे सामोरे जावे यावर परिणाम करणारे अनेक घटक असतात.
- लैंगिक शोषणाचा अनुभव घेतल्यानंतर, ती अत्यंत क्लेशकारक घटना असूनही मुले आणि तरुण यामधील लवचिकता त्यांना प्रगती करण्यास सक्षम बनवते. आपल्या लहान मुलामध्ये किंवा तरुण मुलांमध्ये लवचिकता (resilience) रुजवण्यासाठी अनेक मार्ग आहेत.



Ch-017.indd 18 16-11-2021 09:49:04

## Acknowledgments

1. Pradeep Sharma, Project Director, Children Against Child Abuse (CACA) for providing the questions generated through consensus building, interactive workshops, and assessments conducted with teachers and parents across India, providing permission to reproduce posters from project CACA books, and the shaken baby sketch.
2. Ms Riya Rawat, a psychology student and Mr Sandeep Kumar, Faculty, Sociology, University of Delhi, for providing technical help in getting images used in the guidelines and other technical issues.
3. Mr Sudarshan Khanna and Miss Saumya Pushkarna for acting as parents to tell us how a parent would take it as beneficiary and also for the "disclosure audio" from the workshop conducted with the students of mass communication from Times Media School of Bennet University.
   *https://www.cineink.com/radio/child-abuse-sexual-exploitation-bullying-bennett-university-students-share-stories.html/*
   The recording was part of the workshop: *https://youtu.be/hZhA34UeTI4.*
4. Child Line for the beautiful documentary on sexual abuse "Komal".
5. Time Media School for the 19 min Video on sexual abuse.
6. All iSTOCK images have been purchased by Dr Kiran Aggarwal. All Pixabay images are free online. Images from Social Axiom Foundation are supplied as voluntary assistance to IAP guidelines.


## USEFUL RESOURCES

- Child Helpline 1098: *childlineindia.org*
- POCSO e-box: *ncpcr.gov.in*
- Child Abuse Study 2007 (MWCD Govt. of India)
- POCSO Amendment Act 2019
- User Handbook on POCSO Act: NCPCR
- Juvenile Justice Act Rules 2016
- *https://www.aafp.org/afp/2010/1115/afp20101115p1233.pdf*
- *https://www.nctsn.org/sites/default/files/resources/sexual_development_and_behavior_in_children.pdf*
- *https://www.childwelfare.gov/pubPDFs/f_abused.pdf. Sexual Behaviors in Children: Evaluation and Management: Nancy D Kellogg, MD, University of Texas Health Science Center at San Antonio, San Antonio, Texas.*
- *https://www.hindustantimes.com/lifestyle/relationships/study-reveals-spanking-may-affect-brain-development-of-a-child-101618287968399.html.*




*Source*: Pixabay.